संगणक सांकेतांक- २०११०५२०१६२४०३००१


# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण भाग एक-ल

वर्ष १, अंक ५८(५)] मंगळवार, सप्टेंबर १, २००९/भाद्र १०, शके १९३१ [पृष्ठे ८

किंमत : रुपये २०.००

असाधारण क्रमांक २२०


## प्राधिकृत प्रकाशन

(केंद्रीय) औद्योगिक विवाद अधिनियम व मुंबई औद्योगिक संबंध अधिनियम यांखालील (भाग एक, चार-अ, चार-ब आणि चार-क यांमध्ये प्रसिद्ध केलेल्या अधिसूचना, आदेश व निवाडे यांव्यतिरिक्त) अधिसूचना, आदेश व निवाडे.

### उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३१ ऑगस्ट २००९

### अधिसूचना

**किमान वेतन अधिनियम, १९४८.**

क्रमांक किवेअ. ८२००९/प्र.क्र. ११८५/कामगार - ७.—ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने, महाराष्ट्र राज्यातील " विटा व कौलांच्या (टेराकोटाच्या किंवा मातीच्या) कारखान्यातील कामधंदा " यातील रोजगारात असलेल्या (यात यापुढे ज्याचा " उक्त अनुसूचित रोजगार " असा उल्लेख करण्यात आलेला आहे.) कामगारांना देय असलेले किमान वेतन दर शासन अधिसूचना, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्रमांक एमडब्ल्युए-५२८३/सीआर-५५१४/कामगार-७, दिनांक २० ऑक्टोबर १९८३ अन्वये पुनर्निर्धारित केलेले आहेत ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने पुनर्विलोकन करून, उक्त अनुसूचीत रोजगारातील कामगारांना देय असलेले किमान वेतन दर पुनर्निर्धारित करण्याचे ठरलेले आहे.

त्याअर्थी, आता किमान वेतन अधिनियम, १९४८ (१९४८ चा ११) हा महाराष्ट्र राज्यास लागू करताना त्याच्या कलम ३, पोट-कलम (१) चा खंड (ब) आणि कलम ५ च्या पोट-कलम (२) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, शासकीय अधिसूचना, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र. किवेअ-११२००८/प्र. क्र. १०६५/कामगार-७, दिनांक ५ फेब्रुवारी २००९ मध्ये प्रसिद्ध झालेल्या प्रस्तावाच्या संबंधात मिळालेली सर्व अभिवेदने विचारात घेतल्यानंतर महाराष्ट्र शासनाने यापुढे दिनांक ३१ ऑगस्ट २००९ पासून उक्त अनुसूचित रोजगारात नोकरीत असलेल्या यासोबत जोडलेल्या अनुसूचीच्या स्तंभ (२) मध्ये नमूद केलेल्या कामगारांच्या वर्गाला त्या अनुसूचीच्या स्तंभ (३) मध्ये नमूद केल्याप्रमाणे वेतनाचे किमान वेतन दर पुनर्निर्धारित करीत आहे :—

## अनुसूची

| अनु-क्रमांक (१) | कामगारांची वर्गवारी (२) | मूळ किमान वेतन दर (रुपये) (३) परिमंडळ-१ | परिमंडळ-२ |
|---|---|---|---|
| | **विटा विभाग** | | |
| १ | विटा तयार करणारे कामगार— | | |
| | ९" X ४" X ३" आकाराची वीट | ३००.०० प्रति हजारी | २८०.०० प्रति हजारी |
| | ९" X ४" X ६" आकाराची वीट | ६००.०० प्रति हजारी | ५६०.०० प्रति हजारी |
| २ | विटा वाहणारे कामगार— | | |
| | ९" X ४" X ३" आकाराची वीट | ६५.०० प्रति हजारी | ६०.०० प्रति हजारी |
| | ९" X ४" X ६" आकाराची वीट | १३०.०० प्रति हजारी | १२०.०० प्रति हजारी |
| ३ | व्यवस्थापक/मुकादम/पर्यवेक्षक/लेखापाल | ३,७००.०० दरमहा | ३,६००.०० दरमहा |
| ४ | भटकर (भट्टी लावणारे) | ३,५००.०० दरमहा | ३,४००.०० दरमहा |
| ५ | कोयलावाला (कोळसा फोडणारे) | ३,३००.०० दरमहा | ३,२००.०० दरमहा |
| | **कौले विभाग** | | |
| १ | कुशल | ३,७००.०० दरमहा | ३,६००.०० दरमहा |
| २ | अर्धकुशल | ३,५००.०० दरमहा | ३,४००.०० दरमहा |
| ३ | अकुशल | ३,३००.०० दरमहा | ३,२००.०० दरमहा |

**स्पष्टीकरण.**—या अधिसूचनेच्या प्रयोजनार्थ,—

(अ) **परिमंडळ-१**.—सर्व महानगरपालिका क्षेत्र व त्यांच्या सिमेपासून २० कि. मी. चा परिसर.

(ब) **परिमंडळ-२**.—परिमंडळ-१ मध्ये सामाविष्ट नसलेला उर्वरित सर्व परिसर.

(क) रोजंदारीवर काम करणाऱ्या कामगारास देय असलेले मजुरीचे किमान वेतन दर तो कामगार ज्या वर्गाचा असेल, त्या वर्गासाठी निश्चित करण्यात आलेल्या मासिक मजुरीच्या दरांना २६ ने भागून येणारा भागाकार नजीकच्या पैशापर्यंत पूर्णांकात करून काढण्यात येईल.

(ड) किमान वेतनामध्ये साप्ताहिक सुट्टीच्या वेतनाचा सामावेश असेल.

(इ) किमान वेतन दरामध्ये मूळ वेतन दर, विशेष भत्ता आणि सवलती असल्यास, त्याचे रोख मूल्य यासाठी अनुज्ञेय असलेल्या सर्व दरांचा सामावेश असेल.

(फ) एखादा कुशल कामगार म्हणजे जो स्वतःच्या निर्णय शक्तीनुसार आपले काम कार्यक्षमतेने व जबाबदारीने पार पाडू शकतो, असा कामगार.

(ज) अर्धकुशल कामगार म्हणजे जो सर्वसाधारणपणे नित्याच्या स्वरुपाचे काम करतो की, ज्यामध्ये निर्णय घेण्याची फारशी गरज नसते. परंतु तुलनेने त्याला दिलेले छोटेसे काम की, ज्यामध्ये महत्त्वाचे निर्णय इतरांकडून घेतले जातातअसे काम योग्य रीतीने पार पाडण्याची आवश्यकता असते. मर्यादित व्याप्तीचे नित्याचे काम पार पाडणे हेच त्याचे कर्तव्य असते.

(च) अकुशल कामगार म्हणजे ज्यास लहानसा किंवा स्वतंत्र निर्णय घेणे आणि पूर्वानुभव असणे आवश्यक नाही, परंतु तरीही व्यावसायिक परिस्थितीची माहिती असणे आवश्यक आहे, असे साध्या कर्तव्य पालनाचा अंतर्भाव असलेले काम करणारा कामगार म्हणून त्याच्या कामासाठी शारीरिक परिक्षमाशिवाय निरनिराळ्या वस्तूंची किंवा मालाची चांगली माहिती असणे आवश्यक असेल.

## परिशिष्ट

महाराष्ट्र राज्यातील १० केंद्रांचा सरासरी ग्राहक मूल्य निर्देशांक (नवीन मालिका १९८२=१००) हा उक्त अनुसूचित रोजगारात नोकरीत असलेल्या कामगारांना लागू असलेला राहणीमान निर्देशांक असेल, महाराष्ट्र शासनाने नियुक्त केलेला सक्षम प्राधिकारी, १ जानेवारी आणि १ जुलै रोजी सुरू होणाऱ्या प्रत्येक सहामाहीच्या समाप्तीनंतर त्या सहा महिन्यांसाठी उक्त कर्मचाऱ्यांना लागू असलेल्या राहणीमान निर्देशांकाची सरासरी काढील आणि ५८४ निर्देशांकांवर अशा सरासरीची वाढ निश्चित करून अशा प्रत्येक अंकाच्या वाढीसाठी ज्या सहामाहीच्या संबंधात अशी सरासरी काढण्यात आलेली असेल, त्या सहा महिन्यांलगत पुढील सहामाहीच्या उक्त कर्मचाऱ्यांना देय असलेला विशेष भत्ता (यात यानंतर ज्याचा " राहणीमान भत्ता " असा निर्देश करण्यात आला आहे.) परिमंडळाशी संबंधित दरमहा रुपये ३.०० या दराने असेल.

२. सक्षम प्राधिकारी, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, उपरोक्तप्रमाणे हिशोब करून काढलेला राहणीमान भत्ता जेव्हा जानेवारी ते जून या कालावधीतील प्रत्येक महिन्यासाठी देय असेल, तेव्हा जानेवारी महिन्याच्या शेवटच्या आठवड्यामध्ये आणि जेव्हा जुलै ते डिसेंबर या कालावधीतील प्रत्येक महिन्यासाठी देय असेल, तेव्हा जुलै महिन्याच्या शेवटच्या आढवड्यामध्ये जाहीर करील :

परंतु सक्षम प्राधिकारी , किमान वेतन निश्चित केल्याच्या दिनांकापासून देय असलेला राहणीमान भत्ता, जून किंवा डिसेंबर अखेरपर्यंत किंवा यथास्थिती, किमान वेतन दर निश्चित करण्यात आल्याच्या दिनांकानंतर लगेचच जाहीर करील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**ल. ना. सदाफुले,**
कार्यासन अधिकारी.